मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पुणे

मराठी विभाग

(11)

भाषिक सर्वेक्षण अहवाल

मामासाहेब मोहोळ महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ डिसेंबर २०१८ ते २८ डिसेंबर २०१८ या कालावधीत 'विशेष श्रमसंस्कार शिबिर' घेण्यात आले. सदर शिबिर मु. पो. रखवे, ता. मुळशी, जि. पुणे या गावात घेण्यात आले.

या शिबिराचा एक भाग म्हणून बुधवार दि. २६-१२-२०१८ रोजी मराठी विभागाच्या वतीने रखवे गावातील लोकांचा भाषिक सर्वे करण्यात आला. या भाषिक सर्वे साठी विभागाच्या वतीने ७४ प्रश्नांची प्रश्नावली करण्यात आली होती. रखवे गावात आम्ही दुपारी १२.३० च्या दरम्यान पोहोचलो. मग १.०० वाजता भाषिक सर्वेक्षणाला सुरुवात केली. दुपारची वेळ असल्याने गावात - घरी फार माणसे उपलब्ध नव्हती. कर्ती माणसे सकाळीच आपापल्या कामाला - शेतीला निघुन गेली होती. त्यामुळे गावात उपलब्ध असलेल्या व त्यातही सर्वेसाठी सहकार्य देणाऱ्या लोकांशी प्रश्नावलीच्या माध्यमातून संवाद साधला. जवळपास ३० व्यक्तींचा सर्वे करण्यात आला. यामध्ये स्त्री-पुरुष यांचा समावेश होता.

सदर प्रश्नावलीमध्ये सण, लोकपरंपरा, भाषा, म्हणी, वाक्प्रचार, लोकदैवते, दैनंदिन खाद्यपदार्थ, व्यवसाय, शेती, इतिहास, परंपरा, आदी मुद्द्यांना धरून प्रश्न विचारण्यात आले.

- गावात पंचमी, दसरा, दिवाळी, संक्रांत, बैलपोळा, आदी सण साजरे केले जातात.
- पिके :- ऊस, इंद्रायणी तांदूळ (इंद्रायणी), वांगी, कोरे भाजीपाला.
- भाषा :- मराठी सर्वाधिक बोलली जाते. हिंदी क्वचित, इंग्रजी तुरळक.
- उखाणा :- पानात पान शंभर सुपारी, नामदेवरावांच्या माझे व्यापारी.
- लोकदैवते :- भैरवनाथ, वाघजाई देवी.

- शेती :- सापटं, उजवण, वावर, आऊली, कुळव, मैड, नांगर, खुरं, ईळा, पेरारी, बांध, फावडं, धान, ज्वारी, गुंधडं, उगनी, कडबा, कालान, उरवड, खळगं, खळं, पेरणी, निंदणी, मळणी, भरणी, लवाळं, हराळं, सारे पाउले, बाजरी, तण, तणकट, लावणी, काढणी, मेरत, डवरं, सांड, वखई, तुवई, रान, पठार, रपटं, डोह, खापणं, कांदे, कुळव, नांगर, कडवळ, तार, सरमाड, दुरडं, आंब,

- काळाच्या ओघात हरवत चाललेल्या गोष्टी :-
जातं, गावपण, माणुसकी, परस्पर स्नेह, मोट, औत, बैलगाडी, मेट, कुळव, गाय-बैल वगैरे पाळीव प्राणी, घंगाळ, मळणी, कारली, गाडगं, गोफण, रांजण, कणगी, कोनकी, चूल, वाईट,

- गावातले रितीरिवाज :-
भजन-कीर्तन होते. वर्षातून दोनदा जत्रा भरते.

- म्हणी :- खायला नाही आज, वरतिन्ह मान,
- मी नाही जातली, कडी लावा आतली
- खायला काळ, धरणीला भार.
- ओ ओ म्हशी, मला कुठं नेशी
- कुऱ्हाडीचा दांडा, गोतास काळ
- आसंन माना हरी, तर देईन खाटल्यावरी
-

☐ सर्वेक्षण कर्ते :- डॉ. विजय बाल्घरे, प्रा. सुशील धसकटे

☐ विद्यार्थी :- दिनेश जोरी (बी.ए.तृ.व.)
- किशोर जाधव (एस.वाय.बी.ए.)
- ओमकार पाटील (बी.ए. तृ.व.)
- विशाल साठे (बी.ए. तृ.व.)

24.1.2019.

(डॉ. विजय बालघरे)
मराठी विभाग प्रमुख